# माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य

| अ क्र | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| १ | योजनेचे नाव | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |
| २ | योजनेबद्दलचा शासन निर्णय | शासन निर्णय दिनांक 14.01.1985, दिनांक 13.09.1994 |
| ३ | योजनेचे स्वरूप | सदर योजनेंतर्गत राज्यातील मान्यता प्राप्त व अनुदानित शैक्षणिक संस्थेत पदवी व पदव्युत्तर स्तरावर शिक्षण घेणाऱ्या माजी सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलतीचा लाभ देण्यात येतो. सदर शिष्यवृत्तीसाठी केवळ शासकीय, अनुदानित महाविद्यालयांतील विद्यार्थीच पात्र आहेत. |
| ४ | योजनेचा उद्देश | राज्यातील मान्यता प्राप्त व अनुदानित शैक्षणिक संस्थेत पदवी व पदव्युत्तर स्तरावर शिक्षण घेणाऱ्या माजी सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलतीचा लाभ देणे. |
| ५ | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | सर्व प्रवर्गासाठी |
| ६ | योजनेच्या प्रमुख अटी | 1 महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र धारण करणाऱ्या किंवा महाराष्ट्रात भरती झालेल्या मेजर, नौदल वा वायु दलातील तत्सम दर्जाच्या हुद्यापर्यंत (वा त्यापेक्षा कमी दर्जाच्या हुद्यावरुन) सेवेतुन निवृत्त झालेल्या माजी सैनिकांच्या मुलांना/मुलींना, पत्नींना/विधवांना या योजनेखाली शैक्षणिक सवलती देय आहेत.<br>2 वार्षिक परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास अथवा वरच्या वर्गात पदोन्नत न झाल्यास या सवलती स्थगीत ठेवण्यात येतील. मात्र जर नंतर विद्यार्थी वरच्या वर्गात पदोन्नत झाला की त्यास ही सवलत पुढे चालू ठेवण्यात येईल<br>3 या सवलतीचा लाभ घेणाऱ्या व्यक्तीस अन्य दुसऱ्या योजनेखाली फी माफी, पुस्तक अनुदान, गणवेश अनुदान इत्यादी सवलतींचा लाभ या सवलती बरोबर घेता येणार नाही. तसेच एकाच वेळी एका विद्यार्थ्याला एका पेक्षा जास्त अभ्यासक्रमांना या सवलतीचा लाभ दिला जाणार नाही.<br>4 केवळ शासकीय, अनुदानित महाविद्यालयांमधील अभ्यासक्रमास प्रवेश घेणारे विद्यार्थीच अर्ज करण्यास पात्र आहेत.<br>5 महाराष्ट्रा बाहेर शिकत असलेले महाराष्ट्रातील विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकत नाहीत.<br>6 या सवलती समाधानकारक प्रगती, चांगली वर्तणूक व नियमित उपस्थिती असल्यास विहित अभ्यासक्रम संपेपर्यत चालू राहतील.<br>7 नूतनीकरनासाठी विद्यार्थानी मागील वर्षीच्या Application ID चा उपयोग करावा. |
| ७ | आवश्यक कागदपत्रे | 1. महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र किंवा पालकांचे माजी सैनिकाचे महाराष्ट्रात भरती / सेवानिवृत्त झालेबाबतचे प्रमाणपत्र.<br>2. डी.एस.एस.ए.बोर्ड/सी.एस.एस.ए.बोर्ड यांचे महाराष्ट्र राज्याचे अधिकार पत्र धारण करीत असल्याचे किंवा महाराष्ट्रात भरती झाल्याचे व मेजर व नौदल आणि वायुदलातील तत्सम दर्जाच्या हुद्दापर्यंत वा (या हुद्दापेक्षा कमी हुद्दावरुन) निवृत्त माजी सैनिक असल्याचे प्रमाणपत्र.<br>3. मागील वर्षाची गुणपत्रीका. |
| ८ | दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप | 1. प्रवेश शुल्क - 100 टक्के<br>2. सत्र शुल्क - 100 टक्के<br>3. ग्रंथालय शुल्क -100 टक्के<br>4. प्रयोगशाळा शुल्क - 100 टक्के<br>5. शिक्षण शुल्क - लाभार्थी विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काची रक्कम महाविद्यालयांकडून आकारली जात नाही. तसेच संबंधित महाविद्यालयास सदरची रक्कम देण्यात येत नाही. |
| ९ | अर्ज करण्याची पध्दत | नवीन मंजुरी व नूतनीकरण यासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. |
| १० | ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | www.mahadbtmahait.gov.in |